विदर्भकन्या आहेत हे मात्र नावानिशी सांगतो. अशा ह्या नाट्यसंपन्न विदर्भात माझा जन्म झाला हे माझे भाग्य समजतो आणि मराठी रंगभूमीचं लेणं असलेल्या वै. बालगंधर्वांवर झालेलं कर्ज फेडण्यात देखील ह्याच विदर्भाने मदत केलेली आहे, ह्याचा मला अभिमान आहे.

अशा ह्या श्रीमंत विदर्भातून बाहेर पडून एकूणच रंगभूमीचा विचार केल्यास असे आढळून येते की मराठी रंगभूमीचे अनेक पदर व प्रवाह आहेत. प्रत्येकाचे वेगळेपण आहे व ते ठळकपणे दिसतदेखील आहे.

व्यावसायिक रंगभूमी मुंबई व पुण्यातच ठाण मांडून बसली आहे. ती नाट्यव्यवसायाची बाजारपेठच आहे. हौशी रंगभूमीच्या कलावंताना तिकडे जाण्याचे आकर्षण आहे. पण अडचणीही तशाच आहेत. ह्याच्या अगदी उलट हौशी रंगभूमी महाराष्ट्राच्या कानाकोप-यात पसरली आहे. बोलपटांच्या सुरुवातीला त्याकाळी व्यावसायिक रंगभूमीची झालेली दैनावस्था सुरळीत करण्यासाठी तत्कालीन नाट्यधुरंधरांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई ची स्थापना करत मराठी रंगभूमीला वळण देण्याचा प्रयत्न केला, हे सर्वश्रुतच आहे. पण आज ह्या परिषदेच्या आणि शासनाच्या समोर संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या हौशी रंगभूमीच्या अडीअडचणी समजावून घेऊन हौशी रंगकर्मी आणि हौशी रंगभूमीला स्थिरत्व कसे येईल ह्याचा विचार करणे आवश्यक झाले आहे. महाराष्ट्राच्या सर्वच प्रादेशिक विभागात हौशी नाट्यसंस्था आपल्या आत्मतुष्टीसाठी नाटक करताना दिसतात. त्यांना खूप अडचणी येतात, त्याचा पाढा वाचत बसत नाही. चांगली संहिता न मिळणे, डी.आर.एम.नं., लेखकाची परवानगी, तालीम हॉल, स्त्रीपात्र न मिळणे, नाट्यगृहाची भाडी, पेंटींग, प्रसिद्धी, तिकीट विक्री एवढे करुनही प्रेक्षकांचा अल्प प्रतिसाद, त्यामुळे आर्थिक गणित बिघडणे नि त्याचा सादरी करणावर परिणाम होणे इ.

शासनाच्या राज्यनाट्य स्पर्धा ह्या अडचणींवर उपाय म्हणून शासनाने सुरु